# मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण संस्था
## बृहन्मुंबई महानगरपालिकाद्वारा स्थापित

नोंदणी क्रमांक 891/98


मुंजिएनिसं/माशिसं/७६५६ दिनांक: १३/६/२६

मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण संस्थेमार्फत इन्टेन्सीफाईड आय.ई.सी मोहिमे अंतर्गत व जागतिक एड्स दिन २०२६ निमित्त मुंबई शहरात एचआयव्ही/एड्स प्रसार व उपचार याबाबत जनजागृती करण्याकरीता पथनाट्य गटांची निवड करण्यात येणार आहे.

### ➢ ऑडिशनचे वेळापत्रक आणि ठिकाण

- दिनांक: शुक्रवार, २४ जुलै २०२६
- वेळ: सकाळी ११:०० वाजता
- ठिकाण: मुंजिएनिसंस्थेचे मुख्य कार्यालय, हॉल नं. २

### ➢ नोंदणी कशी करावी? (E-mail Registration)

इच्छुक पथनाट्य संस्थांनी ई-मेलद्वारे नोंदणी करणे बंधनकारक आहे. ई-मेलद्वारे नोंदणी केलेल्या गटांनाच ऑडिशनमध्ये प्रवेश दिला जाईल.

- नोंदणीची अंतिम तारीख: शुक्रवार, २२ जुलै २०२६ (सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत)
- ई-मेल आयडी: oomeshmdacs@gmail.com
- ई-मेलमध्ये पाठवायची माहिती:

  १. पथनाट्य गटाचे नाव (Troupe Name)

  २. सहभागी कलाकारांची नावे (Members List)

  ३. पथनाट्याची संहिता (Script)

  ४. पथनाट्य गटाचे कागदपत्र (नोंदणी प्रमाणपत्र, उद्यम नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड आणि बँक खात्याचा तपशील)

### ➢ पथनाट्य गट निवडीचे निकष (Selection Criteria)

ऑडिशन दरम्यान खालील ६ मुख्य बाबींवरून गुणांकन (Evaluation) केले जाईल:

१. कालावधी (Duration)

२. नाट्याची संकल्पना/विषय (Contents of Play)

३. सादरीकरण (Performance)

४. प्रेक्षकांशी संवाद (Interaction)

५. परिणामकारकता (Impact)

६. भाषा: मराठी किंवा हिंदी (मुंबईतील स्थानिक जनतेशी संवाद साधता येईल अशी).


ॲक्वर्थ कॉम्प्लेक्स, रफी अहमद किडवाई मार्ग, वडाळा (पश्चिम), मुंबई 400031

दुरध्वनी क्र. 24100246 / 47 फॅक्स क्र. 24100250 ई-मेल mumbaimacs@gmail.com


*Life is precious ... ... Stop HIV/AIDS*
*Keep the Promise*

Path :

### ➢ विषयाचे मुख्य मुद्दे (Core Themes/Focus Areas)

एचआयव्ही/एड्स जनजागृतीमध्ये नेमके कोणते मुद्दे असावेत याचा तपशिल खालीलप्रमाणे:

- एड्सबाबतचे गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करणे.
- ART उपचार पद्धती आणि मोफत औषधोपचाराची माहिती.
- एड्सग्रस्त रुग्णांशी होणारा भेदभाव कमी करणे. (Stigma & Discrimination).
- जवळच्या चाचणी केंद्रांची (ICTC Centers) माहिती.
- एड्स हेल्पलाईन नंबर १०९७ बाबत माहिती
- मुंजिएनिसंस्था व आयसीटीसी केंद्राबाबत माहिती

### ➢ आवश्यक कागदपत्रे (Required Documents)

नोंदणीकृत पथनाट्य संस्थांनी खालील कागदपत्रांच्या प्रती ई-मेलद्वारे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे, तसेच निवड झालेल्या संस्थांना कागदपत्रांच्या मूळ प्रती (Original Copies) पडताळणीसाठी सोबत आणणे बंधनकारक असेल:

१. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (Registration Certificate)
२. उद्यम नोंदणी प्रमाणपत्र (Udyam Registration Certificate)
३. संस्थेचे पॅन कार्ड (PAN Card)
४. बँक खात्याचा तपशील (Bank Account Details - Cancelled Cheque/Passbook)

### ➢ आवश्यक नियम व अटी (Rules & Requirements)

- कालावधी: पथनाट्य १० ते १२ मिनिटांचे असावे.
- संहिता (Script): आकर्षक, मनोरंजक आणि थेट संदेश देणारी असावी.
- गट रचना (Team Size): लोककलेच्या गरजेनुसार संघात ६ ते ७ सदस्य असावेत.
- विविधता: संघात महिला, पुरुष आणि तरुणांचे प्रतिनिधित्व असावे.
- समन्वयक (Co-ordinator): प्रत्येक पथनाट्य गटाला एक मुख्य संघ समन्वयक असणे आवश्यक आहे.
- साहित्य व वेशभूषा: सादरीकरणासाठी आवश्यक वाद्ये (Musical Instruments) आणि विषयानुसार आवश्यक वेशभूषा (Costume) स्वतःची असावी.
- कौशल्य: लोककला सादर करण्याचे उत्तम कौशल्य असावे. तसेच मोठ्या जनसमुदायाशी प्रभावीपणे संवाद साधण्याची आणि कार्यक्रम व्यवस्थापनाची क्षमता असावी.
- प्रवास करण्याची तयारी: मुंबईतील वेगवेगळ्या भागात जाऊन सादरीकरण करण्याची (Travel करण्याची) गटाची तयारी असावी.
- पथनाट्य सादरीकरण करण्याकरीता उपस्थित पथनाट्य गटास सामाजिक विषयांवर पथनाट्य सादरीकरणाचा किमान २ ते ३ वर्षाचा अनुभव असणे गरजेचे आहे.

- पथनाट्य सादरीकरण करण्याकरीता उपस्थित गटांनी सहभागी कलाकारांची यादी,पथनाट्याची संहिता, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, उद्यम नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड आणि बँक खात्याचा तपशील या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतिचा संच पडताळणीसाठी सोबत आणणे आवश्यक असेल.
- निवड समितीचा निर्णय अंतिम व सर्व गटांवर बंधनकारक राहील.
- परिस्थितीनुसार ऑडिशनच्या तारखेत किंवा वेळेत बदल करण्याचा अधिकार संस्थेला असेल आणि तसे झाल्यास नोंदणीकृत गटांना कळवले जाईल.
- निवड झालेल्या संस्थांना मुंजिएनिसंस्थेसोबत ठराविक कालावधीचा करार (Agreement) करावा लागेल.
- निवड झाल्यानंतर संस्थांना मुंबईतील नियुक्त केलेल्या भागातच (उदा. झोपडपट्ट्या, रेल्वे स्टेशन परिसर, कॉलेज परिसर) ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार सादरीकरण करावे लागेल.
- संपर्क: काही अडचण असल्यास कृपया २४१००२४६/४७ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

(डॉ. विजयकुमार करंजकर)
अति. प्रकल्प संचालक, मुंजिएनिसं